I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** सातारा शहर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0355 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/04/2026 23:13 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 17/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 17/04/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ४ **Time From (वेळेपासून):** 11:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 11:45 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 17/04/2026 **Time (वेळ):** 22:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 069 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 17/04/2026 23:13 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सिव्हील हस्पीटल सातारा , जवळील अन्नपुर्णा फोटो स्टुडिओ,व झेरक्स सेंटर येथे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल दाजी पाटील

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु थावडे , पो सोंडोली, ता शाहुवाडी , जिकोल्हापुर , सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | रुद्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, , सातारा ताजिसातारा, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8308469377

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंदा गोपाळ वाळवेकर | | | 1. एसपीएस कलेजच्या मागे,Town/Village (शहर / गाव): सोनगाव ताजिसातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 17/04/2026

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, व्यवसाय - पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. रुद्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, सातारा ता.जि.सातारा मुळ रा. मु. थावडे पो. सोंडोली, ता. शाहुवाडी जि.कोल्हापुर मोनं - 8308469377

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 09/03/2026 रोजी श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन कक्षात हजर असलेल्या तक्रारदार डॉ. विश्वजीत अरूण बाबर वय-48 वर्षे, शिक्षण- बी.ए.एम.एस. व्यवसाय- डॉक्टर रा. 105, रविवार पेठ, सातारा यांची ओळख करुन देवुन त्यांना लाचेची मागणी होत असुन त्यांचे तक्रारीवर पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

त्यानुसार कृषी अधिक्षक कार्यालय सातारा येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. सागर अर्जुन डांगे, तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय सातारा 2. राहुल दाजीराम सोलंकर, तंत्र अधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय सातारा हे उपस्थित राहीले. दोन्ही पंचांना तक्रारदार बाबर यांची व सापळा पथकातील पोहवा गोगावले, ताटे राजपुरे, चव्हाण तसेच पोशि शिंदे, थोरात यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. विश्वजीत बाबर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सागर अर्जुन डांगे पंच क्र.2 म्हणून श्री. राहुल दाजीराम सोलंकर हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार विश्वजीत बाबर यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी पंचासमक्ष तक्रार सांगीतली की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून माझे शिक्षण बी.ए.एम.एस. झालेले असून मी व माझे भागीदार डॉ. संकेत शिरसाठ असे मिळून मेढा ता.जावली जि. सातारा येथे सन 2024 पासून श्रीदत्त मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, मेढा या नावाचे हॉस्पीटल भागीदारीमध्ये चालवित आहे. तसा आमच्यात करार झाला आहे. सदर हॉस्पीटलचा रजिस्ट्रेशन नंबर SAT/001 दि.25/10/2023 असा आहे. हॉस्पीटलमध्ये सोनोग्राफी सेंटर, सरकारमान्य गर्भपात केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र सुविधा चालू करण्यासाठी शासकीय मान्यता घेण्याचे आमचे ठरले होते. सदर मान्यता सिव्हील सर्जन यांचेकडुन दिली जाते.

माझे भागीदार डॉ. संकेत शिरसाठ यांनी दिनांक 24/10/2024 रोजी व दिनांक 12/01/2026 रोजी वैदयकिय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, मेढा यांना सोनोग्राफी सेंटर, सरकारमान्य गर्भपात केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र या सुविधा चालू करण्यासाठी लागणारा परवाना मिळणेसाठी अर्ज केला होता. सदर अर्ज हा पुढील कार्यवाहीसाठी सिव्हिल हॉस्पीटल, सातारा येथे पाठविण्यात आलेला आहे. सिव्हिल हॉस्पीटल येथे सदर प्रकरणाचा पाठपुरावा मी हॉस्पीटलचा व्यावसायिक भागीदार असल्याने स्वत: करीत आहे.

त्यानुसार दिनांक 04/03/2026 रोजी मी सिव्हिल हॉस्पीटल, सातारा येथील डॉ. युवराज करपे, सिव्हील सर्जन, सिव्हील हॉस्पीटल, सातारा यांची भेट घेतली असता, त्यांनी सोनोग्राफी सेंटर, सरकारमान्य गर्भपात केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र सुरु करणेसाठी त्यांचेकडुन देण्यात येणारे प्रमाणपत्र तयार आहे. पुढील माहिती साठी तुम्ही शिपाई वाळवेकर यांना भेटा असे सांगितले. त्यानुसार मी शिपाई वाळवेकर यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, करपे साहेबांनी तीनही परवानांचे

एकूण 50,000/- द्यायला सांगितले आहेत. त्यानंतरच तुम्हाला प्रमाणपत्र देणार आहेत. त्यावेळी मी वाळवेकर यांना सांगीतले की, या कामासाठी अगोदरच माझे भागीदार डॉ. संकेत शिरसाठ यांनी एकदा पंचवीस हजार रुपये व एकदा चाळीस हजार रुपये असे दोन वेळा एकूण 65,000/- रु दिलेले आहेत. त्यावेळी शिपाई वाळवेकर यांनी मला सांगितले की, हे मी करपे साहेबांना सांगितले आहे त्यांनी अजून 50,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले आहे. मी त्यांना पैसे दिले नाहीत तर माझे काम होणार नाही म्हणून मी नाईलाजाने पैसे देण्यास होकार दिला. त्यावेळी शिपाई वाळवेकर हे माझ्याकडे मागणी करीत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली. परंतू त्यांना लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

मी दिनांक 09/03/2026 रोजी सिव्हिल हॉस्पीटल, सातारा येथील शिपाई वाळवेकर व डॉ. युवराज करपे, सिव्हील सर्जन, सातारा यांची सिव्हिल हॉस्पीटल, सातारा येथे जावुन भेट घेणार असून त्यांचेशी माझ्या कामाबाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चेमध्ये त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास आपले विभागाकडून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यास विनंती आहे.

सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील शिपाई वाळवेकर, व डॉ. युवराज करपे, सिव्हिल सर्जन, सातारा यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार अगर पुर्ववैमनस्य नाही. या मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार डॉ.विश्वजीत बाबर यांचेकडे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील शिपाई वाळवेकर व सिव्हील सर्जन डॉ युवराज करपे हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये एमएम कार्डस कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. तसेच ला.प्र.वि.सातारा कार्यालाचे व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन दाखवुन त्यामध्ये केडीएम कंपनीचे नवीन मेमरीकार्ड घातले व सदर मेमरीकार्ड मध्ये सापळा कारवाई निवेदन, लाच रक्कम तसेच तक्रारदार यांचे कामाची कागदपत्रे जप्त करतानाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देवुन 11.45 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. सदर निवेदनाचे व्हिडीओ छायाचित्रण ला.प्र.वि.सातारा कार्यालयाचे मोबाईल व्दारे पोहवा ताटे यांनी केले आहे. त्यानंतर तक्रारदार बाबर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने व्हॉईस रेकॉर्डर लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. सागर डांगे यांचेसह पडताळणीकामी ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथुन तक्रारदार यांचेकडील बुलेट दुचाकी वाहन क्रमांक एम एच 11 डी सी 9808 वरुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.04 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे पहील्या मजल्यावर गेलो असता तक्रारदार

हे एका इसमाजवळ जावुन "वाळवेकर साहेब नमस्ते" असे म्हणाले तेव्हा मला ते शिपाई वाळवेकर असल्याचे समजले. त्यावर तक्रारदार त्यांना "अं...थोडं या की इकडं, परवा आलो होतो की नाही मागच्या बुधवारी" असे म्हणाले त्यावर वाळवेकर बर म्हणाले. त्यावर "मेढयाचं हॉस्पीटल.." असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर "बरं.. हा हा.. काय ओ हॉस्पीटल" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "दत्त हॉस्पीटल, ऐका की, ऐका की, 50 ठरलं होतं ना आपलं" असे म्हणाले त्यावर शिपाई वाळवेकर "हु." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "मग कधी घेऊन येऊ" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर हे "त्यात समजलचं नाय काय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "तुम्हांला आठवलं का, तुम्ही मला या कधी पण घेऊन असं म्हणाला होतात" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर "उद्या या उद्या" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "घेऊन कधी येऊ" असे विचारले त्यावर शिपाई वाळवेकर हे "उद्या" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "ऐका की, आता एकदा विचारुन घेताय का साहेबांना, मी काय म्हणतोय बघा" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर हु.. असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे "बघा 50 मध्ये सगळं करा कुठलं" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर "बघु सर काय म्हणतात, फाईल तरी बघु द्या" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "सोन.. एमटीपी ट्युब आणि सोनोग्राफी" असे म्हणाले व वाळवेकर यांना "बरं मग थांबू का" असे विचारले असता वाळवेकर यांनी हाताने खुनवुन उद्या येणेबाबत सांगीतले. त्यावर तक्रारदार "ऐका की तुम्ही, द्यायचे तुमच्याकडेच द्यायचे आहेत ना. घ्या की आता ऑलरेडी झालंय लेट लयं, मी तर म्हणलं आज आलो असतो तर, किती वाजता" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर यांनी "काय नाय, उद्या या उद्या" असे सांगीतले. त्यानंतर मी व तक्रारदार सिव्हील हॉस्पीटलचे बाहेर येवुन तक्रारदार यांचे बुलेट मोटारासायकल वरुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयात परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 09/03/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे भेट होवुन त्यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. शिपाई वाळवेकर यांनी तक्रारदार यांना दिनांक 10/03/2026 रोजी सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे भेटण्यास बोलाविलेने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक 10/03/2026 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 09.00 वा. हजर झाले. तेव्हा मी पडताळणी कारवाईच्या सुचनांची उजळणी करुन घेवुन 09.57 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. सागर डांगे यांचेसह पडताळणीकामी ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथुन तक्रारदार यांचेकडील दुचाकीवरुन रवाना केले ते 11.42 वा. परत आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता सिव्हील सर्जन चेंबर च्या बाहेर उभ्या असलेल्या शिपाई यांना "नमस्ते वाळवेकर सर आलेत का" असे विचारले असता त्यांनी नाही आजारी आहेत ते" असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेशी चर्चा केली व सर भेटतील" असे विचारले असता सदर इसमाने

सर येतील आता 10 मिनीटात" असे सांगीतलेने मी व तक्रारदार तेथेच थांबुन राहीलो. थोड्या वेळाने सिव्हील सर्जन यांचे चेंबर मध्ये एक इसम मला जाताना दिसला. त्यानंतर त्यांना भेटण्यास येणारे लोक आत जात होते. त्यावेळी तक्रारदार यांनी "एक तास झाला दहा वाजता आलोय मी"असे तेथील शिपाई यास सांगीतले. तेव्हा शिपाई "नाही आता काय कराव. सरांनी बोलावल्याशिवाय मी काय सांगणार" असे सांगीतले म्हणुन आम्ही बाहेरच थांबुन राहीलो. त्यानंतर थोड्या वेळाने सिव्हील सर्जन यांचे चेंबरमधुन एक इसम बाहेर आला तेव्हा तक्रारदार त्यांना "सर काल आलो होतो वाळवेकरांना भेटलो" तेव्हा मला ते सिव्हील सर्जन डॉ. करपे असल्याचे समजले. त्यावर डॉ. करपे बर असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "तुमी सांगीतल्याप्रमाणे" असे म्हणाले व पण ते म्हणले आज सकाळी दहा वाजता या

तर आज दहा वाजल्यापासुन येवुन थांबलोय दीड तास झाल थांबलोय, ते म्हणले आतच थांबा थांबा थांबा असे म्हणाले. त्यावर डॉ करपे यांनी त्यांचे शिपाई कडे पाहुन "वाळवेकर डमिट आहेत म्हणुन सांगा ना" असे म्हणाले. त्यावर शिपाई "सांगीतली की" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "पुढ काय करु आता तुमी म्हणला होता वाळवेकरांना भेटा" असे विचारले. त्यावर डॉ. करपे "बोलतो मी त्याच्याशी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "मग मी कधी येवु" असे म्हणाले. त्यावर डॉ. करपे "सांगतो त्याच्यापशी" असे म्हणाले. व जाता जाता दोन दिवसांनी या असे म्हणाले व तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी व तक्रारदार सिव्हील हॉस्पीटलचे बाहेर येवुन तक्रारदार यांचे बुलेट मोटारासायकल वरुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयात परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 10/03/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व सिव्हील सर्जन डॉ. करपे यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे भेट झाली परंतु सिव्हील सर्जन करपे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली नाही. शिपाई वाळवेकर यांची भेट दोन दिवसांनी होणार असल्याने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिले सुचनेप्रमाणे दिनांक 13/03/2026 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 10.15 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेवुन त्यानंतर 10.58 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. सागर डांगे यांचेसह पडताळणीकामी ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथुन तक्रारदार यांचेकडील दुचाकीवरुन रवाना केले ते 11.24 वा परत आले. त्यावेळी पंच नंबर 1 यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता शिपाई वाळवेकर यांची भेट झाली. तेव्हा तक्रारदार त्यांना "वाळवेकर साहेब नमस्ते" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर हे "नमस्ते काय म्हणताय" त्यावर तक्रारदार "आलो होतो परवा दिवशी मी डॉ बाबर" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर यांनी "सर भेटले का" असे विचारले. त्यावर तक्रारदार "हो भेटले की सर आपण ते मेढ्याच हॉस्पीटल होत ना, एन पी आणि सोनोग्राफी" असे म्हणाले. त्यानंतर चर्चा करुन वाळवेकर "काय

सांगीतल सरांनी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "मला म्हणाले तुमच्याशी बोलतो" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "आज नाही येणार, तुमचा नंबर देवुन जावा" असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल नंबर एका कागदावर लिहुन शिपाई वाळवेकर यांचेकडे दिला. त्यानंतर चर्चा करुन तक्रारदार "दोन मिनीट येताय इकडे त्यादिवशी आपला काय विषय झालाय एनटी आणि सोनाग्राफी ह्या तीनीच काम हाय, बर तीन फाईल हायत, पहीले आपण पासष्ट दिलेत, एकदा पंचवीस आणि एकदा चाळीस दिलेत संकेत सरांनी" असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर आलो आलो म्हणाले. त्यावर तक्रारदार त्यादिवशी आपला काय विषय झालाय एनपीटी, ट्युबेकटॉम आणि सोनाग्राफी असे म्हणाले. त्यावर वाळवेकर हु म्हणाले. त्यावर तक्रारदार "बर तीन फाईल हायत, पहीले आपण पासष्ट दिलेत, एकदा पंचवीस आणि एकदा चाळीस दिलेत संकेत सरांनी" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "सरांना का" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "संकेत सरांनी तुमच्याकडेच दिले होते चाळीस, तुमी काय म्हणताय तीनीचे अजुन पन्नास, पण हे आत्ता हे तिनीचे मिळुन अजुन पन्नास हे कन्फर्म. परत असो नको व्हायला की" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "लक्षात आल का आता पन्नास हजार दिले की हा विषय संपला पहीले पासष्ट व आत्ताचे पन्नास हजार" असे म्हणाले त्यावर वाळवेकर हे "पासष्ट नाय आले" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "पहीले पंचवीस साहेबांना दिलेत, चाळीस तुमच्याकडे दिले होते. साहेबांच्या लक्षात येईना" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "त्याच्याकड दिल काय नाव ते एक्सरेवाला त्याच्याकड दिल, त्यान ठेवले, दिले सरांना" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "हा...हा... म्हणजे तुमच्या लक्षात आल ना साहेबांच कस हाय साहेब असत्यात त्यांच्या व्यापात" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व वाळवेकर यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली. तेव्हा तक्रारदार "तुमी कॉल करताय सोमवारीच ना मग कारण मी जाणार आहे उद्या परवा गावाला, जावु का" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "झाली ना तर करुन देतो मग तर बस ना" असे म्हणाले. त्यानंतर चर्चा करुन मी व तक्रारदार सिव्हील हॉस्पीटलचे बाहेर येवुन तक्रारदार यांचे मोटारासायकल वरुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयात परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

एकंदरीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 13/03/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे भेट झाली त्यावेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. तसेच तक्रारदार यांना दिनांक 16/03/2026 रोजी कामासंदर्भाने भेटण्यास बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 16/03/2026 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 10.00 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेवुन त्यानंतर 12.41 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकीवरुन सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे रवाना केले ते पुन्हा 13.07 वा कार्यालयात परत आले त्यावेळी आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता शिपाई वाळवेकर यांची भेट झाली. तेव्हा तक्रारदार

त्यांना "वाळवेकर साहेब नमस्कार" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "नमस्कार, येताय आतमध्ये" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आत येवु व्हयं." असे म्हणाले. त्यावर वाळवेकर हा म्हणाले. तेव्हा तक्रारदार व मी सिव्हील सर्जन यांचे चेंबर मध्ये आत गेलो. तेव्हा चेंबर मध्ये सिव्हील सर्जन करपे हे त्यांचे आसनावर बसुन होते. तेव्हा शिपाई वाळवेकर हे तक्रारदार यांना घेवुन न्टी चेंबर मध्ये गेले तेव्हा मी त्यांचे मागे जात असताना वाळवेकर यांनी मला हाताने थांबण्याचा इशारा केला तेव्हा मी सिव्हील सर्जन करपे यांचे चेंबरमधील खुर्चीवर बसुन राहीलो. त्यानंतर तक्रारदार यांना न्टीचेंबरमध्ये गेल्यावर काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की मी शिपाई वाळवेकर यांचेसोबत न्टीचेंबर मध्ये गेलो तेव्हा मी त्यांना "झालं का बोलणं झालं का साहेबांशी?" असे म्हणालो. त्यावर वाळवेकर "साहेबांशी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "हा,काय म्हणले?" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "तुम्ही म्हणला ना फाईलच ते." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "हा.. किती बोलले साहेब?" असे विचारले असता शिपाई वाळवेकर यांनी "हळु की.." असे म्हणुन तक्रारदार यांना उजव्या हाताची पाच बोटे दाखवुन लाच रक्कमेबाबत इशारा केला. त्यावर तक्रारदार "पन्नास, पन्नास हजार फायनल ना, परत एक्स्ट्रा नाय ना, काय, किती वाजता येवु मग, लगेच" असे म्हणाले. त्यावर वाळवेकर "या की.." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "तुम्ही फोन करतो म्हणाला होता ना, तुमचा फोन आला नाय म्हणुन" असे म्हणाले व "कधी येवु"असे विचारले. तेव्हा शिपाई वाळवेकर "लगेच" असे म्हणाले. त्यानंतर मी न्टी चेंबर मधुन बाहेर आलो व पंच नंबर 1 यांचेसोबत मोटारसायकल वरुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयात परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 16/03/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे समक्ष भेट झाली त्यावेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी शिपाई वाळवेकर यांनी तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

लोकसेवक वाळवेकर यांनी तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदार व पंचांचे सहमतीने लोकसेवक सिव्हील सर्जन करपे यांची पडताळणी करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार तक्रारदार व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर 13.41 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. सागर डांगे यांचेसह पडताळणीकामी ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन रवाना केले ते 13.59 वा परत आले. त्यावेळी आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता सिव्हील सर्जन करपे हे कार्यालयात उपस्थित नसल्याने पुन्हा ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आलो.

त्यानंतर 15.48 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार बाबर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने व्हॉईस रेकॉर्डर लावुन देवुन तक्रारदार व पंच नंबर 1 यांना सिव्हील सातारा येथे तक्रारदार यांचेकडील दुचाकीवरुन रवाना केले. तक्रारदार व पंच ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ

16.08 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता शिपाई वाळवेकर हे चेंबरचे बाहेर उभे होते तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "सर कुठे आहेत?" असे विचारले तेव्हा वाळवेकर यांनी "आहेत की आतमध्ये" असे सांगीतले. तेव्हा मी व तक्रारदार सिव्हील सर्जन करपे यांचे चेंबरमध्ये गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी वाळवेकर यांना "आमत्रंण द्यायचं राहीलं की सकाळी," "आमत्रंणाचं पाडव्याचं" असे म्हणाले. त्यावेळी वाळवेकर यांनी माझ्याकडे बोट दाखवुन तक्रारदार यांना इशाऱ्याने कोण आहेत असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी "मावस भाऊ, मावस भाऊ हाय" असे सांगीतले. तेव्हा वाळवेकर यांनी मला हाताने इशारा करुन बाहेर थांबण्यास सांगीतले. तेव्हा तक्रारदार "बाहेर बसवु का.... सागर बाहेर थांब" असे म्हणाले. त्यानंतर मी सिव्हील सर्जन चे चेंबरचे बाहेर येवुन थांबलो. त्यानंतर पुढे काय घडले याबाबत तक्रारदार बाबर यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की मी वाळवेकर यांना "मी जावु का भेटायला" असे विचारले तेव्हा त्यांनी हो म्हणुन सांगीतले. तेव्हा मी सिव्हील सर्जन यांचे न्टी चेंबर मध्ये गेलो व "नमस्कार सर" असे म्हणालो. तेव्हा सिव्हील सर्जन करपे "काय हुतं तुमचं" असे म्हणाले. त्यावर मी "सर ते उद्घाटन पाडव्याला घ्यायचं होत एमटीपी, ट्युबेकटॉमी आणि सोनोग्राफी, म्हणलं तुम्ही म्हणाला तसं वाळवेकर साहेबांना भेटलो सकाळी" असे म्हणाले. त्यावर सिव्हील सर्जन "बरं" असे म्हणाले. त्यावर मी "करतो तुम्ही सांगितल्याप्रमाणे, पाडव्याला आपल्याला शक्य होईल का" असे म्हणालो. तेव्हा सिव्हील सर्जन यांनी "आता कुठंल सर्टीफिकेट लागतयं"असे विचारले. तेव्हा मी त्यांना "तिन्ही, एम टी पी ट्युब आणि हे" असे सांगीतले. तेव्हा सिव्हील सर्जन करपे यांनी "नाय पण तुमचं राहीलयं कुठंल आता" असे विचारले. तेव्हा मी त्यांना "तिन्ही राहीलयं सर" असे म्हणालो. त्यावेळी सिव्हील सर्जन यांनी चर्चा करुन वाळवेकर यांना "याची तिन्ही सर्टीफिकेट देवुन टाका ना, एम टी पी ट्युब आणि" असे सांगीतले. त्यानंतर मी व सिव्हील सर्जन यांनी कामाबाबत चर्चा केली तेव्हा सिव्हील सर्जन यांनी शिपाई वाळवेकर यांना "यांचे सर्टीफिकेट द्या ना हे काय म्हणतात ते" असे सांगतले तेव्हा शिपाई वाळवेकर यांनी "झालं की सकाळी बोलणं झालं की" असे सांगीतले. तेव्हा सिव्हील सर्जन यांनी "नाय नाय, त्यांची ती सर्टीफिकेट राहीलेत ना, पी सी पी एन डी टी, पुनमकडचं आणि कुचेकर कडचं ते दोन्ही आणुन ठेवा" असे सांगीतले. तेव्हा मी "तीन सर" असे म्हणालो. त्यानंतर चर्चा करुन मी व वाळवेकर असे सिव्हील सर्जन करपे यांचे चेंबरचे बाहेर आलो. तेव्हा पंच नंबर 1 हे कक्षाचे बाहेर थांबुन होते. त्यावेळी मी पंच नंबर 1 यांचेसमक्ष वाळवेकर यांना "मी कधी येवु पाकीट घेवुन" असे विचारले तेव्हा वाळवेकर यांनी "नंतर, मी सांगतो सरांना, सर सांगत्यात आता" असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना "मग मी थांबु का?" असे विचारले. तेव्हा वाळवेकर यांनी "नाय नाय सरांच्याकडंच जायचं आता डायरेक्ट" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "मी करु का कॉल तुम्हंाला" असे विचारले असता वाळवेकर यांनी "करा, बघु कसं ती हेचं नाव घेवु नका मला वाटंत भ्या.. एक तर माझं एक दीड वर्ष राहीलंय माझं" असे सांगीतले. त्यानंतर मी वाळवेकर यांचेशी चर्चा करुन "मग मी किती वाजता कॉल करु" असे विचारले तेव्हा वाळवेकर "मी कॉल नाय, मी सर्टीफिकेट घेतो आणि तुम्हांला कॉल करतो मी आल्यावर" असे म्हणाले. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेसोबत सिव्हील हॉस्पीटल सातारा चे बाहेर येवुन पंचासोबत दुचाकीवरुन ला.प्र.वि.कार्यालयात परत आलो. वगैरे हकीकत तक्रारदार व पंच नंबर 1 यांनी सांगीतली. त्यानंतर

आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 16/03/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व शिपाई वाळवेकर व सिव्हील सर्जन करपे यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे समक्ष भेट झाली त्यावेळी तक्रारदार व सिव्हील सर्जन करपे यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. परंतु सिव्हील सर्जन करपे यांनी तक्रारदार बाबर यांचेकडे लाचेची मागणी केली नाही. तक्रारदार यांना सर्टिफिकेट मिळाल्यानंतर शिपाई वाळवेकर फोन करणार असल्याने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली व शिपाई वाळवेकर यांचा निरोप आल्यानंतर पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार यांना शिपाई वाळवेकर यांना निरोप न आल्याने पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले त्यानुसार दिनांक 25/03/2026 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 14.00 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेवुन त्यानंतर 14.58 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकीवरुन सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे रवाना केले ते पुन्हा 15.53 वा कार्यालयात परत आले त्यावेळी आम्ही पंच क्र. 01 डांगे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता वाळवेकर यांची भेट झाली त्यावेळी तक्रारदार यांनी दिनांक 26/03/2026 रोजी हॉस्पीटलचे उदघाटन घेतले असल्याचे वाळवेकर यांना सांगीतले व सिव्हील हॉस्पीटल सातारा येथुन मिळणारी प्रमाणपत्रे भेटली नसल्याचे सांगीतले. त्यावेळी वाळवेकर यांनी तक्रारदार यांना सिव्हील सर्जन कार्यालयात हजर नसल्याचे सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी सोमवारी येवु का असे विचारले तेव्हा चर्चा करुन वाळवेकर यांनी नाय, फोन करुन या मला, असे सांगीतले. त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा ला.प्र.वि.कार्यालयात परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांनीही पंच नंबर 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यामुळे दिनांक 25/03/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

शिपाई वाळवेकर यांनी तक्रारदार यांना फोन करुन भेटण्यास येण्यास सांगीतलेने दिनांक 30/03/2026 रोजी पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले त्यानुसार तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 15.30 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेतली व तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह 16.37 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रवाना केले ते 16.56 वा. परत आले. त्यावेळी पंच नंबर 1 यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता शिपाई वाळवेकर यांनी सिव्हील सर्जन करपे हे कार्यालयात उपस्थित नसल्याचे सांगीतले. त्यामुळे मी तक्रारदार पुन्हा ला.प्र.वि.कार्यालयात परत आलो. सिव्हील सर्जन करपे यांनी भेट होणार नसल्याने दिनांक 30/03/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक 01/04/2026 रोजी पुन्हा पडताळणी कारवाई चे नियोजन करण्यात आले. त्यानुसार तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय

कामकाजासाठी 11.00 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेतली व तक्रारदार यांना पंचासमक्ष शिपाई वाळवेकर यांना फोन लावण्याच्या सुचना दिल्या. त्यावेळी 12.07 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु केला त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 9422054153 शिपाई वाळवेकर यांचा फोन नंबर 9096710091 वर फोन केला असता शिपाई वाळवेकर यांनी सिव्हील सर्जन करपे हे आजही कार्यालयात उपस्थित नसल्याचे सांगीतले. सिव्हील सर्जन करपे यांनी भेट होणार नसल्याने दिनांक 01/04/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक 15/04/2026 रोजी पुन्हा पडताळी कारवाईचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात गोपनिय कामकाजासाठी 10.00 वा. हजर झाले. तेव्हा मी पुन्हा पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन घेतली व तक्रारदार यांना पंचासमक्ष सिव्हील सर्जन करपे यांना फोन लावण्याच्या सुचना दिल्या. त्यावेळी 11.59 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु केला त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल नंबर 9422054153 वरुन सिव्हील सर्जन करपे यांचा मोबाईल फोन नंबर 7588383070 वर फोन केला व "म्हटल सर ते आपलं मेढ्याच कामाच राहीलं होत,मग त्याच काय करायच? मी वाळवेकरांना भेटलो परवा ते म्हटले मी तुमच्याशी बोलुन सांगतो" असे म्हणाले. त्यावर डॉ.करपे यांनी "सांगतो मी," असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर 12.48 वा. तक्रारदार यांनी पुन्हा त्यांचे फोनवरुन सिव्हील सर्जन यांचे फोनवर व्हॉट्सअप कॉल केला व "हॅलो, हा गुड मॉर्निंग सर, डॉ बाबर बोलतोय" असे म्हणाले. त्यावर सिव्हील सर्जन करपे "हा सांगितलयं ना, नक्की बघतो मी काय होतयं, मी जरा बाहेरगावी आहे." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "हो सर, हो तुम्ही कोल्हापुरला आहे, सांगितलयं ना सर, ते वाळवेकर सर बोलले. वाळवेकर आण्णा बोललेत तिन्ही सर्टीफिकेटचे पन्नास हजार होतील मग देवु का?, हॅलो सर" असे म्हणाले. तेव्हा सिव्हील सर्जन यांनी फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा फोन लावला असता त्यांनी फोन उचचला नाही.

तक्रारदार यांनी डॉ.करपे यांचेशी मोबाईल फोनवर चर्चा केली परंतु डॉ.करपे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली नाही. त्यामुळे तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह डॉ. करपे व शिपाई वाळवेकर यांची पडताळणी करणेकामी 16.37 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे रवाना केले ते 16.56 वा. परत आले. त्यावेळी पंच नंबर 1 यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे गेलो असता शिपाई वाळवेकर यांची भेट झाली त्यावेळी तक्रारदार यांना सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील साळुंखे मॅडम भेटल्या त्यावेळी तक्रारदार यांचेत व साळुंखे मॅडम यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी शिपाई वाळवेकर तिथे आले तेव्हा तक्रारदार व शिपाई वाळवेकर व साळुंखे मॅडम यांचेत पुन्हा तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर ते पुन्हा एका कक्षात गेले व तेथे जावुन त्यांची तेथील महीला कर्मचारी यांचेशी कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. लोकसेवक डॉ करपे यांची भेट न झाल्याने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली व लोकसेवक वाळवेकर यांचा निरोप आलेनंतर पुन्हा पुढील कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले.

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

तक्रारदार डॉ. बाबर यांनी लोकसेवक वाळवेकर यांचा दिनांक 16/04/2026 रोजी निरोप आला असुन त्यांनी दिनांक 17/04/2026 रोजी लाच रक्कम घेवुन सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे बोलाविले असल्याचे सांगीतले. त्यानुसार दिनांक 17/04/2026 रोजी पंचांना पाचारण करुन सापळा कारवाई चे नियोजन करण्यात आले. तेव्हा मी दोन्ही पंचांना, सापळा पथकास व तक्रारदार डॉ.बाबर यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार बाबर यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 50,000/- रुपये हजर केले. त्यामध्ये 500 रु दराच्या 100 चलनी नोटा होत्या. त्यानंतर पोहवा राजपुरे यांनी लोकसेवक वाळवेकर यांना देण्यासाठी हजर केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन काढले. त्यानंतर मी तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. मी दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पडताळणी कारवाई निवेदन व्हिडीओ रेकॉर्डिंग केलल्या मोबाईलमध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार डॉ.बाबर यांना अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. तसेच सापळा पथकाचे मदतीने आमचे कक्षात खिडक्या बंद केल्यानंतर कृत्रीम अंधारात त्याचे प्रात्यक्षिक पोशि कणसे यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोशि कणसे यांना न्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली असता, पोशि कणसे यांनी कापसाच्या बोळयाने सगळया चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस न्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोशि कणसे यांनी सदर लाच रक्कम तक्रारदार बाबर यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोशि कणसे यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. त्याचवेळी तक्रारदार यांनी लोकसेवक वाळवेकर यांना लाच रक्कम दिल्यानंतर डावा हात डोक्याचे केसावरुन दोनवेळा फिरवण्याचा पुर्वनियोजीत इशारा ठरविण्यात आला. तसेच लाच रक्कम स्विकारलेनंतर पोहवा ताटे यांनी व पोशि थोरात हे लोकसेवक वाळवेकर यांना अटकावुन ठेवतील असे ठरविण्यात आले.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार डॉ.बाबर व दोन्ही पंचांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 11.15 वा ची होती. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टचे आतील बनियानला सेफ्टी पिनच्या सहाय्याने लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 डांगे यांचे सह रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.02 व सापळा पथक असे सापळा कारवाई कामी लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह शासकीय वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व सिव्हील हॉस्पीटल सातारा बाहेर शासकीय वाहन उभे करून सिव्हील हॉस्पीटलचे पहील्या मजल्यावर सिव्हील सर्जन यांचे चेंबरचे जवळपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिलो.

तक्रारदार व पंच क्र.01 हे सिव्हील सर्जन यांचे चेंबरचे समोर जावुन एका इसमासोबत बोलत थांबले थोड्यावेळाने तक्रारदार पंच नंबर 1 व सदर इसम सिव्हील हॉस्पीटलचे बाहेर आले व सिव्हील हॉस्पीटल साताराचे बाहेर जावुन अन्नपुर्णा फोटो स्टुडिओ व झेरॉक्स सेंटर मध्ये गेले. त्यावेळी

सापळा पथक त्यांचे मागोमाग जावुन कोणास संशय येणार अशा रितीने आडोशास उभे राहीलो. थोड्यावेळाने तक्रारदार पंच नंबर 1 व सदर इसम झेरॉक्स सेंटरचे बाहेर आले त्यावेळी तक्रारदार यांनी सापळा पथकाकडे पाहुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार यांचेजवळ गेलो. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 11.45 वाची होती. त्यावेळी मी तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता तक्रारदार यांनी एका इसमाकडे बोट दाखवुन हे लोकसेवक वाळवेकर असल्याचे सांगितले तेव्हा पोहवा ताटे व पोशि थोरात यांनी लोकसेवक वाळवेकर यांना अटकावुन ठेवले ती वेळ 11.47 वा ची होती.

तेव्हा आम्ही लोकसेवक वाळवेकर यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव आनंदा गोपाळा वाळवेकर, वय 58 वर्षे, व्यवसाय नोकरी, शिपाई जिल्हा रुग्णालय सातारा रा. एसपीएस कॉलेजच्या मागे, सोनगाव ता.जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक वाळवेकर यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी माझ्याकडील पॅन्टच्या खिशात ठेवलेली अँथ्रासीन पावडर लावलेली 50,000/- रु लाच रक्कम उजव्या हाताने काढून लोकसेवक वाळवेकर यांचे पुढे धरली असता, त्यांनी ती डाव्या हाताने घेवुन त्यांचे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवली आहे असे सांगीतले. शिपाई वाळवेकर यांना पकडेले ठिकाण हे मेनरोडवर असल्याने आम्ही त्यांना पकडलेल्या अवस्थेत घेवुन सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील वार्ड नंबर 22 मध्ये गेलो. तेव्हा सदरवेळी माझे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक वाळवेकर यांचेकडुन 50,000/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. पंच नं 2 यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक वाळवेकर यांना वार्ड नंबर 22 मधील लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक वाळवेकर यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे अंगावरील पॅन्ट व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक वाळवेकर यांचे डाव्या हाताचे बोटांना व तळहातास निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 50,000/- रुपयेच्या चलनी नोटांवर व लोकसेवक वाळवेकर यांचे अंगावरील पॅन्टचे डाव्या खिशाला अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवक वाळवेकर यांना तक्रारदार यांचे कामाचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता लोकसेवक वाळवेकर यांनी तक्रारदार बाबर यांचे कामाच्या दोन फाईल काढुन दिल्या व एक फाईल ड.साळुंखे मॅडम यांचेकडे असल्याचे सांगीतले. त्यानुसार साळुंखे मॅडम यांनी एक फाईल काढुन दिली. त्यावेळी पंचासमक्ष सदर कागदपत्रे जप्त करण्यात आली. अंथ्रासीन पावडर तपासणी, लाच रक्कम जप्तीचे व कागदपत्र जप्तीचे छायाचित्रण पोशि शिंदे यांनी कार्यालयाचे मोबाईल फोनव्दारे केले आहे.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. ला.प्र.वि.सातारा कार्यालयातआम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे सिव्हील सर्जन यांचे चेंबरचे बाहेर गेलो त्यावेळी तेथे वाळवेकर हजर होते

तेव्हा तक्रारदार त्यांना "वाळवेकर आण्णा नमस्ते" असे म्हणाले त्यावर वाळवेकर नमस्ते असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी "झालय रेडी ?" असे विचारले. तेव्हा वाळवेकर "झालय की" असे म्हणाले व सिव्हील सर्जन यांचे चेंबरमध्ये जावुन दोन फाईल घेवुन आले. फाईलमधील दोन प्रमाणपत्रे तक्रारदार यांचेकडे देवुन "ह्याची झेरॉक्स असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "का ? तुम्हांला द्यायला का?" असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांचेशी चर्चा करुन शिपाई वाळवेकर "कलर झेरॉक्स" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "कलर झेरॉक्स आता इथं कुठं मिळणार" असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर समोर असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "आम्ही दोघंच जातो... गाडी... कलर झेरॉक्स काढायची ना" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार झेरॉक्स काढण्यासाठी जात असताना वाळवेकर सुद्धा आमचेसोबत आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "आणि नाय नाय मी काय म्हणतोय, जातो ते अं.. करपे सरांशी तुमचं बोलण झालयं ना" असे विचारले तेव्हा शिपाई वाळवेकर झालंय की असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "एकदा तुम्ही कन्फर्म करा, फोन करा की म्हणावं" असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर "नाय फोन नाय ना उचलत" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी लाच रकमेचा इशारा करुन तुमच्याकडचं देवु का? असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर हो म्हणाले. त्यानंतर आम्ही चालत चालत सिव्हील हॉस्पीटलचे बाहेर आलो. तेव्हा तक्रारदार यांनी शिपाई वाळवेकर यांना "फक्त कसं हाय सरांना एकदा कन्फर्म करु दे, तुम्ही एकदा फोन लावा तुमच्या फोनवरुन लावा" असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर "नाय उचलत नाय ओ मला म्हणले फेस टु फेस यायचं आणि बोलायचे" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार मग पैसे कोणाला द्यायचे ? असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर "माझ्याकड" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही चालत चालत अन्नपुर्णा फोटो स्टुडिओ व झेरॉक्स सेंटर येथे गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना देण्यात येणाऱ्या दोन प्रमाणपत्रांची कलर झेरॉक्स काढली. तेव्हा शिपाई वाळवेकर "सर या की" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "हाय की... देवु का" असे म्हणाले. तेव्हा शिपाई वाळवेकर हम्म... असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "किती कुठं देवु" असे म्हणाले व त्यांनी लाच रक्कम काढुन शिपाई वाळवेकर यांचेसमोर धरली तेव्हा शिपाई वाळवेकर यांनी लाच रक्कम त्यांचे डावे हातात घेतली व "किती हायत" असे तक्रारदार यांना विचारले तेव्हा तक्रारदार यांनी "पन्नास हायत की" असे सांगीतले. तेव्हा शिपाई वाळवेकर "पाकीट नाय व्हयं घातलं" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "नाय असुद्या ठेवा खिशात" असे म्हणाले. त्यावर शिपाई वाळवेकर "घालु, काय प्रॉब्लेम नाय ना" असे म्हणाले व लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे डावे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार व शिपाई वाळवेकर यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली व कलर झेरॉक्स काढुन झालेनंतर झेरॉक्स दुकानाचे बाहेर आले. त्यावेळी तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल असा डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक वाळवेकर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

यातील तक्रारदार डॉ. विश्वजीत अरूण बाबर वय-48 वर्षे, शिक्षण- बी.ए.एम.एस. व्यवसाय- डॉक्टर रा. 105, रविवार पेठ, सातारा ता.जि.सातारा यांनी दिनांक 09/03/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 09/03/2026, 10/03/2026, 13/03/2026, 16/03/2026, 25/03/2026, 30/03/2026, 01/04/2026, 15/04/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली असुन दिनांक 17/04/2026 रोजी

सापळा कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक 16/03/2026 रोजी करण्यात आले पडताळणी कारवाई वेळी यातील तक्रारदार यांना लोकसेवक आनंदा गोपाळा वाळवेकर, वय 58 वर्षे, व्यवसाय नोकरी, शिपाई जिल्हा रुग्णालय सातारा वर्ग - 4, रा. एसपीएस कॉलेजच्या मागे, सोनगाव ता.जि.सातारा यांनी तक्रारदार यांचे श्रीदत्त मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, मेढा येथील सोनोग्राफी सेंटर, सरकारमान्य गर्भपात केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र याचे मान्यता प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे सिव्हील सर्जन डॉ. युवराज करपे यांचेसाठी पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली पन्नास हजार रुपये लाच रक्कम दिनांक 17/04/2026 रोजी करण्यात आले सापळा कारवाई वेळी सिव्हील हॉस्पीटल सातारा जवळील अन्नपुर्णा फोटो स्टुडिओ व झेरॉक्स सेंटर येथे पंच नंबर 1 यांचे समक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** AVINASH dnyaneshwar MANE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** AVINASH dnyaneshwar MANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PSMH27226

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1968 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**